विशेष पोलीस वार्तापत्र
स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा

बुलडाणा
दिनांक 18.04.2021

दिनांक 17.04.2021 रोजी श्री. बळीराम गिते, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, दिनांक 17.04.2021 रोजीचे रात्रीच्या सुमारास मध्यप्रदेशातुन गौवंश जनावरांनी भरलेला ट्रक मोताळा येथे येणार आहे अशा माहितीवरून त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे तीन अधिकारी व पोलीस ठाणे बोराखेडीचे एक अधिकारी यांचे नैतृत्वात एक पथक तयार केले आणि प्राप्त माहितीप्रमाणे त्यांना पाठविले.

दिनांक 18.04.2021 चे 01.00 वा चे सुमारात एक 12 टायरचा मोठा ट्रक मलकापूर येथून मोताळाकडे येताना दिसला त्यास स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणाचे पथकाने शिताफीने अडवून त्याची पाहणी केली असता त्यात 47 गौवंश जनावरे मिळून आली (पैकी पाच मयत स्थितीत आढळून आले). त्यानंतर ट्रक चालक व त्याचे सोबत असलेले इतर तीन इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचे नावे पुढील प्रमाणे 1. ट्रक चालक आयुब खान कूदरत खान, वय 52 वर्ष, रा करोंड पुलिया, भोपाळ 2. इरफान मुन्ना निहारगड, 3. फिरोज मुबारिक निहारगड, 4. फिरोज जाकीर मुलतानी, अ क्र 2 ते 4 सर्व राहणार मुलतानपुरा मनसरोवर, मध्येप्रदेश असे आहे.त्यांचे ताब्यातून 47 गौवंश पशु, 2 मोबाईल, एक 12 टायर मोठा ट्रक असा एकूण 18 लाख 62 हजार रु चा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला. तसेच गोवंशांना पुढील योग्य ते पालन पोषनाकरिता श्री हरी गौशाला, बेलाड, ता मलकापूर जि बुलडाणा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही आज दिनांक 18.04.2021 चे सकाळच्या सुमारास पो.स्टे.बोराखेडी येथे सदरचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया करण्यात आली. सदरची कार्यवाही श्री अरविंद चावरिया, पोलीस अधीक्षक, बुलडाणा, श्री बजरंग बनसोडे, अपर पोलीस अधीक्षक, बुलडाणा श्री हेमराजसिंह राजपूत, अपर पोलीस अधीक्षक, खामगांव जि बुलडाणा, श्री बळीराम गिते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांचे मार्गदर्शनात सपोनि नागेशकूमार चतरकर, पोउपनि निलेश शेळके, पोउपनि श्रीकांत जिंदमवार, पोउपनि अनिल भुसारी, पोलीस अमंलदार मिलींद सोनोने, गजानन आहेर, सतिष जाधव, गजानन गोरले, विजय वारूळे, विजय पैठणे असे स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे बोराखेडी यांचे संयुक्त पथकाने केली आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,
बुलडाणा